एकलव्य चे प्रकाशन

# नाव चालली रे

एक चित्रकथा




वी. सुतेयेव



# नाव चालली रे

चित्र आणि कथा

वी. सुतेयेव



एकलव्य चे प्रकाशन

**नाव चालली रे**
एक चित्रकथा
चित्र आणि कथाः वी. सुतेयेव
अनुवादः माधव केळकर

‘स्टोरीज़ एण्ड पिक्चर्स’ ची एक चित्रकथा
प्रगति प्रकाशन, मास्को च्या सौजन्या ने इंग्रेज़ीतून अनुवादीत आणि प्रकाशित


हे पुस्तक मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत शासन आणि
सर रतन टाटा ट्रस्ट च्या आर्थिक सहयोग ने प्रकाशित

संस्करणः डिसेम्बर 2000 / 2000 प्रति
पहला पुनर्मुद्रणः सप्टेंबर 2015 / 2000 प्रति
दूसरा पुनर्मुद्रणः फेब्रुवारी 2020 / 2000 प्रति
तीसरा पुनर्मुद्रणः डिसेम्बर 2022 / 2000 प्रति
कागज़ः 100 gsm मेपलिथो और 220 gsm पेपर बोर्ड (कवर)
ISBN: 978-81-87171-93-5
मूल्यः ₹ 45.00

प्रकाशकः **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर
फॉर्च्यून कस्तूरी के पास, जाटखेड़ी,
भोपाल - 462 026 (मप्र)
फोनः +91 755 - 297 7770, 71, 72
www.eklavya.in / books@eklavya.in

मुद्रकः आर के सिक्युप्रिंट प्रा लि, भोपाल फोनः +91 755 2687 589

# नाव चालली रे



एक बेडूक, एक कोंबडीचे पिल्लू, एक उंदीर, एक मुंगी आणि एक किडा फिरायला निघाले.

चालत चालत ते सगळे एका तलावाकाठी पोहोचले.




“चला पोहू या” असे म्हणत बेडकाने पाण्यात उडी घेतली.



“पण आम्हाला कुठे पोहता येत?” पिल्लू, उंदीर, मुंगी आणि किडा म्हणाला.

“टर्र टर्र टर्र. मग इथे तुमचं काय काम?” बेडूक खदाखदा हसू लागला. बेडूक इतका हसला की त्याचा श्वास कोंडला.




बेडकाचं वागणं पाहून पिल्लू, उंदीर, मुंगी आणि किड्याला फार वाईट वाटले. काही तरी युक्ति करावी म्हणून ते सगळे विचार करु लागले. विचार करता करता त्यांना एक युक्ति सुचली.



पिल्लू गेलं आणि
थोड्याच वेळाने एक
पान घेरुन आलं.




उंदीर गेला आणि
अक्रोडाचे टरफल
घेऊन आला.



मुंगीनं गवताची एक लांब काडी आणली.

आणि किड्याने काळ्या रंगाचा एक
लांब धागा आणला.





मग ते सगळे कामाला लागले. त्यांनी गवताची काडी अक्रोडाच्या टरफलात अडकवली आणि पान त्यात बांधले. लवकरच एक सुंदर नाव तयार झाली.




त्यांनी मग नाव पाण्यात सोडली आणि चारीजण नावेत बसले. नाव चालू लागली.



बेडकान आपलं
डोकं पाण्याबाहेर
काढलं. तो पुन्हा
हसणार होता पण
नाव फार दूर
निघून
गेली होती.

इतकी दूर की आता बेडूक नावेपर्यंत पोहचू शकणार नव्हता.





एकलव्य

मूल्य: ₹ 45.00

9788187171935

SRTT & NRTT के वित्तीय सहयोग से विकसित